3 0 JUL 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वारणा विद्यापीठ कुलगुरूपदी डॉ. दिगंबर शिर्के

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची वारणानगर येथील वारणा समूह विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू म्हणून महाराष्ट्र शासनातर्फे नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्तीचा आदेश मंगळवारी विद्यापीठ कार्यालयास प्राप्त झाला.

डॉ. शिर्के यांची कुलगुरूपदावरील नियुक्ती ते विद्यापीठाच्या प्रथम कुलगुरूपदाचा पदभार ज्या दिनांकाला स्वीकारतील, त्या दिनांकापासून एक वर्षाच्या



कालावधीसाठी किंवा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमाच्या कलम ११ मधील तरतुदींन्वये नियुक्त केलेले कुलगुरू आपले पदग्रहण करेपर्यंत, यापैकी जे आधी घडेल, तोपर्यंत करण्यात आली आहे. डॉ. शिर्के शिवाजी विद्यापीठातील त्यांचा कार्यकाळ पूर्ण होईपर्यंत वारणा विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू म्हणून अतिरिक्त कार्यभार धारण करतील आणि त्यानंतर ते वारणा विद्यापीठाचे पूर्णवेळ प्रथम कुलगुरू होतील, असेही आदेशामध्ये म्हटले आहे. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी यापूर्वी सातारा येथे नव्याने स्थापित कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू म्हणूनही काम पाहिले आहे. त्याचप्रमाणे मुंबई विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू म्हणून अतिरिक्त कार्यभार त्यांनी सांभाळला आहे.

## मातृसंस्थेसाठी काम करण्याची संधी : कुलगुरू डॉ. शिर्के

वारणानगर येथील वारणा समूह विद्यापीठाचा प्रथम कुलगुरू होणे ही माझ्यासाठी भाग्याची गोष्ट आहे. याचे कारण म्हणजे माझे पदवी स्तरावरील प्रथम वर्षाचे शिक्षण हे याच संस्थेमध्ये झाले आहे. तेथून पुढे मी कोल्हापूर येथे शिक्षणासाठी दाखल झालो आणि पुढील समग्र कारकीर्द शिवाजी विद्यापीठात साकार झाली. आता शिवाजी विद्यापीठासारख्या मातृसंस्थेतील सेवा समाधानपूर्वक पूर्ण करीत असतानाच ही नवी संधी प्राप्त झाल्याने या मातृसंस्थेसाठीही काम करता येणार आहे, याचा आनंद वाटतो.

तरुण भारत

# वारणा समूह विद्यापीठाच्या प्रथम कुलगुरुपदी डॉ. शिर्के

## महाराष्ट्र शासनातर्फे नियुक्तीचा आदेश जारी

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची वारणासमूह विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू म्हणून नियुक्ती झाली. महाराष्ट्र शासनातर्फे नियुक्तीचा आदेश मंगळवारी शिवाजी विद्यापीठ कार्यालयास प्राप्त झाला.

डॉ. शिर्के प्रथम कुलगुरुपदाचा जेव्हा पदभार स्वीकारतील तेथून पुढे एक वर्ष पदावर राहतील. ते शिवाजी विद्यापीठातील त्यांचा कार्यकाळ पूर्ण होईपर्यंत वारणा विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू म्हणून अतिरिक्त कार्यभार धारण करतील. डॉ. शिर्के यांनी यापूर्वी सातारा येथे कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू त्याचप्रमाणे मुंबई विद्यापीठाचे



प्रभारी कुलगुरू म्हणून अतिरिक्त कार्यभार सांभाळला आहे.

वारणानगर येथील वारणासमूह विद्यापीठाचा प्रथम कुलगुरु होणे ही माझ्यासाठी भाग्याची गोष्ट आहे. माझे पदवी प्रथम वर्षाचे शिक्षण या संस्थेत झाले. तेथून पुढे मी कोल्हापूर येथे शिक्षणासाठी दाखल झालो. पुढील समग्र कारकीर्द शिवाजी विद्यापीठात साकार झाली. आता शिवाजी विद्यापीठासारख्या मातृसंस्थेतील सेवा समाधानपूर्वक पूर्ण होतानाच नवी संधी मिळाली आहे. या मातृसंस्थेसाठीही काम करता येणार आहे, असे डॉ. शिर्के यांनी सांगितले.

लोकमत

# डी.टी. शिर्के वारणा समूह विद्यापीठाचे पहिले कुलगुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची वारणानगर येथील वारणा समूह विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू म्हणून महाराष्ट्र शासनातर्फे नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्तीचा आदेश मंगळवारी विद्यापीठ कार्यालयास प्राप्त झाला.



डॉ. शिर्के यांची कुलगुरू पदावरील नियुक्ती ते विद्यापीठाच्या प्रथम कुलगुरूपदाचा पदभार ज्या दिनांकाला स्वीकारतील. डॉ. शिर्के हे शिवाजी विद्यापीठातील त्यांचा कार्यकाळ पूर्ण होईपर्यंत त्या पदाची कर्तव्ये सांभाळून वारणा विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू म्हणून अतिरिक्त कार्यभार धारण करतील. त्यांची शिवाजी विद्यापीठातील मुदत ७ ऑक्टोबर २०२५ ला संपत आहे. त्यानंतर ते वारणा विद्यापीठाचे पूर्णवेळ प्रथम कुलगुरू होतील, असेही आदेशामध्ये म्हटले आहे. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी यापूर्वी सातारा येथे नव्याने स्थापित कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू म्हणूनही काम पाहिले आहे. मुंबई विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू म्हणून अतिरिक्त कार्यभार त्यांनी सांभाळला आहे.

> “ वारणानगर येथील वारणा समूह विद्यापीठाचा प्रथम कुलगुरू होणे भाग्याची गोष्ट आहे. याचे कारण म्हणजे माझे पदवी स्तरावरील प्रथम वर्षाचे शिक्षण हे याच संस्थेमध्ये झाले आहे. तेथून पुढे कोल्हापूर येथे शिक्षणासाठी दाखल झालो. पुढील कारकीर्द शिवाजी विद्यापीठात साकार झाली.
>
> **-डॉ. डी.टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ**

पुढारी

# वारणा समूह विद्यापीठाच्या प्रथम कुलगुरूपदी डॉ. डी. टी. शिर्के

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची वारणानगर येथील वारणा समूह विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू म्हणून राज्य शासनाने मंगळवारी नियुक्ती केली.

डॉ. शिर्के यांची शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदाची मुदत लवकरच संपत आहे. हा कार्यकाळ पूर्ण होईपर्यंत ते नव्या पदाचा अतिरिक्त कार्यभार पाहणार आहेत. शिवाजी विद्यापीठाचा कार्यकाळ संपल्यानंतर ते वारणा विद्यापीठाचे पूर्णवेळ कुलगुरू म्हणून काम पाहतील. यापूर्वी त्यांनी सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू, मुंबई विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू म्हणूनही काम पाहिले आहे.

> ❝ माझे पदवी स्तरावरील प्रथम वर्षाचे शिक्षण हे याच संस्थेमध्ये झाले आहे. त्याच वारणा समूह विद्यापीठाचा प्रथम कुलगुरू होणे भाग्याची गोष्ट आहे. नवी संधी प्राप्त झाल्याने मातृसंस्थेसाठी काम करता येणार आहे, याचा आनंद आहे.
>
> -डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

पुढारी

# विद्यापीठातील डेटा विश्लेषणाबाबत व्यवस्थापन विकास कार्यक्रमास प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा संख्याशास्त्र अधिविभाग आणि गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकारी प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आणि कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लिमिटेड यांच्या सहकार्याने पी.एम.-उषा प्रायोजित 'डेटा विश्लेषण व बँकिंग नियामक अनुपालनासाठी मायक्रोसॉफ्ट एक्सेलचा वापर' या विषयावर एकदिवसीय व्यवस्थापन विकास कार्यक्रम झाला. जिल्ह्यातील विविध सहकारी बँकांमधील ६० अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख होते. कार्यक्रमात एक्सेलमधील मूलभूत टूल्स व फंक्शन्स, बँकिंग नियामक निकषांनुसार अहवाल तयार करणे तसेच प्रत्यक्ष बँकिंग डेटावर आधारित प्रात्यक्षिक सत्र यांचा समावेश करण्यात




आला. पहिल्या सत्रात डॉ. सोमनाथ पवार यांनी 'एक्सेलच्या वापराची मूलभूत माहिती, महत्त्वाची साधने व बँकिंगसाठी उपयुक्त फंक्शन्स' यांचे मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात आरबीएल बँकेचे रमेश लोणार यांनी 'असेट लायबलिटी मॅनेजमेंट व नियामक अनुपालन' या विषयावर सखोल विवेचन केले. दुपारच्या सत्रात एस. व्ही. राजगुरू यांनी प्रत्यक्ष डेटावर आधारित विश्लेषणाचे प्रशिक्षण दिले. डॉ. राजन पडवळ यांनी स्वागत केले. अनिल नागराळे, डॉ. शशिभूषण महाडिक यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सोमनाथ पवार यांनी आभार मानले.

पुढारी

# विदेशी भाषा प्रवेशासाठी अर्ज भरण्यास ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ

**कोल्हापूर :** शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे घेण्यात येणाऱ्या रशियन, जर्मन, जपानी व पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अर्ज भरण्याची मुदत दि. ३१ पर्यंत वाढविण्यात आली आहे. विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे एक वर्ष कालावधीचे रशियन, जर्मन, जपानी व पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम घेण्यात येतात. या अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता प्रत्येकी ५० इतकी आहे. यासाठी पात्रता बारावी उत्तीर्ण अशी आहे. दररोज सायंकाळी एक तास याप्रमाणे वर्ग असतात. इतर अभ्यासक्रम व नोकरी करत भाषा अभ्यासक्रम करता येतो. हे अभ्यासक्रम करून आंतरराष्ट्रीय स्तरावरील भाषा प्रावीण्य परीक्षाही देता येतात. प्रवेशासंबंधी अधिक माहितीसाठी विदेशी भाषा विभाग कार्यालय, वि. स. खांडेकर भाषा भवन येथे संपर्क साधावा, असे आवाहन अधिविभाग प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.

लोकमत

# बी.एस्सी. बी.एड. अभ्यासक्रमास प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क०

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात बी.एस्सी. बी.एड्. (आय.टी.ई.पी.) अभ्यासक्रमाचे उद्घाटन झाले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख पाहुणे होते.

प्रा. पाटील म्हणाले, योग्य मार्गदर्शन, जिज्ञासा, संशोधक वृत्ती व अभ्यासामध्ये सातत्य ठेवल्यास विद्यार्थी ध्येय गाठू शकतात. डॉ. चेतना प्र. सोनकांबळे यांनी स्वागत केले. बी.एस्सी. बी.एड्. (इंटिग्रेटेड टीचर एज्युकेशन प्रोग्राम) अभ्यासक्रमाच्या समन्वयक डॉ. रूपाली संकपाळ यांनी माहिती दिली. राजनंदिनी यांनी सूत्रसंचालन केले. निशांत कुमार यांनी प्रमुखांचा परिचय करून दिला. मोहम्मद कौनेन रझा यांनी आभार मानले. डॉ. अंजली गायकवाड, सारिका पाटील, साबिया बागवान, संगीता चंदनवाले, संजना भालकर, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
30 JUL 2025 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : राज्यस्तरीय ॲथलेटिक्स कार्यशाळेत सहभागी मान्यवर, प्रशिक्षक, पंच, खेळाडू व संयोजक.

# पंचांकडे अचूक निर्णयक्षमता आणि अवलोकन, नियमितता अत्यावश्यक

## शेटगे; राज्यस्तरीय ॲथलेटिक्स कार्यशाळेची सांगता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

ॲथलेटिक्स क्षेत्रात पंचगिरी करताना अचूक निर्णयक्षमता, अचूक अवलोकन व नियमितपणा अत्यावशक आहे. किंबहुना यातूनच योग्य पंच घडतो, असे प्रतिपादन शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त आर. व्ही. शेटगे यांनी केले.

महाराष्ट्र राज्य व कोल्हापूर ॲथलेटिक्स असोसिएशन, शिवाजी विद्यापीठ क्रीडा अधिविभाग आणि देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ॲथलेटिक्स पंचांचे कार्यक्षेत्र, नवीन नियम व डोपिंगविषयी जागृती' या विषयावरील दोनदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा नुकतीच झाली. समारोपाच्या अध्यक्षीय मनोगतात जिल्हा संघटनेचे अध्यक्ष शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त एस. व्ही. सूर्यवंशी यांनी ॲथलेटिक्स खेळामधील सातत्याने बदलत जाणाऱ्या नियमांचा अभ्यास व निरनिराळ्या स्पर्धांमध्ये पंचगिरी करण्याचे आवाहन केले. या कार्यशाळेस लातूर, सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यांतून ७५ पंच, क्रीडाशिक्षक, शारीरिक शिक्षक संचालक, खेळाडू सहभागी झाले होते. तसेच सांगली जिल्ह्याचे सचिव संजय पाटील व महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक्स असोसिएशनचे उपाध्यक्ष डॉ. गणेश सिंहासने यांनी कार्यशाळेत भेट दिली.

कार्यशाळेत पहिल्या दिवशी कॉल रूमचे प्रोटोकॉल, ट्रॅक इव्हेंटस्‌चे मूलभूत नियम, अडथळा, स्टिपल चेसचे आणि रिले स्पर्धेचे नियम, रेस वॉकिंग इव्हेंटचे मूलभूत नियम, रोड रेस आणि क्रॉस कंट्री इव्हेंटचे मूलभूत नियम, एकत्रित इव्हेंटचे (कम्बाईन इव्हेंटस्‌चे) मूलभूत नियम, फिल्ड इव्हेंटचे सामान्य नियम या विषयावर आंतरराष्ट्रीय पंच राकेश सावे यांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवशी आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक सुभाष पवार यांनी डोपिंगविषयीचे धोके, जाणीव, जागृती या विषयावर मार्गदर्शन केले.

स्वागत प्रास्ताविक सचिव प्रकुल पाटील-मांगोरे यांनी केले. अहवाल वाचन प्रा. रामा पाटील यांनी केले. संयोजन प्रा. जालंधर मेढे, अमोल आळवेकर, प्रा. फराकटे, प्रा. नवनाथ पुजारी, अश्विनी पाटील-मांगोरे, महेश मांगले, रोहन माने व सौरभ बावडेकर व सहकाऱ्यांनी केले.